PEER REVIEWED &
INDEXED (SJIF) JOURNAL

ISSN : 2319-8648
Impact Factor : 7.139

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

॥ प्रदीपः सर्वविद्यानाम् ॥

Maharashtra Philosophy Council
and
Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar

Organized

Maharashtra Philosophy Council 37th Conference

Date 1st & 2nd October 2021



Theme of Conference

Contemporary Problems and Role of Philosophers

Philosophy of Dr. Amartya Sen || Philosophy of Modern Saint Vai. Sonopant Dandekar

Executive Editor
Dr. Kiran Save

Co-Editor
Dr. Tanaji Pol
Lt. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor
Mr. Arun B. Godam

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648

Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139 **ISSN – 2319-8648**

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue on

Contemporay Problem and Role of Philosophers

Philosophy of Dr. Amartya Sen & Philosophy of Modern Saint Vai. Sonopanth Dandekar

Oct. 2021

Chief Editor

Mr. Arun B. Godam

Executive Editor

Dr. Kiran Save

Co-Editors

Dr. Tanaji Pol

Asst. Prof. Anagha Padhye

Shaurya Publication , Latur

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Index

Sr.No.	Ttile of the paper	Author's Name	Page No.
1.	Murray Bookchin's Social Ecology: An Alternative Solution to Ecological Crisis	Dr. Amita Valmiki	01
2.	Living the Constitution in a religio-fanatic society; Mahatma Gandhi on democracy and constitution	Dr. Tabassum Sheikh	05
3.	A Critical Study of Mahatma Gandhiji as an Iconic Philosopher of the World	Dr. Surendra S. Khandekar	09
4.	Justice Theory of Amartya Sen with Reference to the Capability Approach	Dr.Tanaji Pol	15
5.	Amartya Sen Philosophy: Key Points on Contributions of Economics	Dr. Yogesh M. Kulkarni	19
6.	Philosophical Problem of intolerance with reference to Amartya Sen, Buddha and J. Krishnamurti	Mr. Jivitesh Patil	25
7.	वै. सोनोपंत दांडेकर यांच्या विचारविश्वाचा मागोवा–'ज्ञानदेव व प्लेटो' या ग्रंथाच्या अनुषंगाने	डॉ. मीनल कातरणीकर	28
8.	तत्त्वज्ञानाचे उपयोजन व उपयोजित तत्त्वज्ञान	डॉ. शर्मिला वीरकर	34
9.	तत्त्वज्ञान की अध्यात्मशास्त्र : कै. सोनोपंत दांडेकर	डॉ. हिरीश नवले	38
10.	स्त्रियांच्या सबलीकरणाबाबतीत अमर्त्य सेनची भूमिका	डॉ. संगीता पांडे	47
11.	तार्किक प्रत्यक्षार्थवादी विचारवंत आणि प्रचितिक्षमतेचे तत्त्व	डॉ. किरण सावे	51
12.	लौकिक जीवनातील समस्यांचे तत्त्वज्ञान करणारा तत्त्वज्ञः संत गाडगे बाबा	डॉ. राजेसाहेब मारडकर	57
13.	आधुनिक संत वैकुंठवासी सोनोपंत दांडेकर यांचे तत्त्वज्ञान : व्यक्ती आणि विचार	प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव	64
14.	मॅक्स वेबर यांची सामाजिक दर्जानुसार वर्गपद्धती / गटपद्धती	डॉ. सुनिलदत्त एस. गवरे	69
15.	बुद्धांच्या अव्याकृत प्रश्नांची तात्त्विक सिद्धता	प्रा. डॉ. अमन बगाडे	74
16.	अमर्त्य सेन यांची आर्थिक व तात्त्विक भूमिका	प्रा. डॉ. सचिन खोकले	77
17.	पर्यावरणीय समस्या आणि तत्त्ववेत्यांची भूमिका	डॉ. वेदप्रकाश डोणगावकर	81
18.	वारकरी संतांचा पर्यावरणाबद्दलचा विचारः एक विवेचन	डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर	85

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

पर्यावरणीय समस्या आणि तत्त्ववेत्यांची भूमिका

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

वर्तमान युग पाहता मानवी जीवन हे समस्यारहित आहे असे, खात्रीलायक विधान करणे शक्य नाही. म्हणजेच आज मानवी जीवन अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. ज्यात आपल्याला मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, आरोग्यविषयक, पर्यावरणविषयक इत्यादी अनेक प्रकारच्या समस्यांचा उल्लेख करावा लागेल. परंतु, मानवी जीवन समस्यांनी युक्त आहे! असे म्हणून चालणार नाही. त्यावर उपायसुद्धा शोधले पाहिजेत. आणि त्या अनुषंगाने तत्त्ववेत्त्यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. कारण तत्त्ववेत्ता हा कुठल्याही विषयाकडे मुळातून आणि विविधांगानी पाहणारा असतो.

देकार्तच्या विचारांच्या आधारे सांगावयाचे झाल्यास, ज्याला समस्येचे आकलन होते, जो त्या समस्येचे कारण शोधतो, समोर आलेल्या कारणांचे विभाजन करतो, त्या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करतो तो तत्त्ववेत्ताच ठरतो. आणि या अनुषंगाने विचार केला असता आपण समस्येसंदर्भात विचार करणारे, त्यांच्या कारणांचा शोध घेणारे आणि त्यांवर उपाय सुचविणारे तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, प्राध्यापकसुद्धा 'तत्त्ववेत्ते' ठरतो. आणि म्हणून समकालीन परिस्थितीमध्ये आपल्या अवती–भोवती ज्या ज्या समस्या आपल्याला दिसतात त्यासंबंधी भूमिका मांडणे हे आपले कर्तव्य आहे. हीच बाब लक्षात घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने पर्यावरणीय समस्येच्या संदर्भात आपली भूमिका काय असली पाहिजे? याविषयी चर्चा करता येईल.

आज 'पर्यावरणीय समस्या' हा एक जागतिक विषय बनला आहे वाढते तापमान, काल चक्रातील अनियमितता, प्रदूषण यांसारख्या समस्यांमुळे मानवी जीवन अस्वस्थ झाले आहे. काही माध्यमांनी केलेल्या सर्व्हेनुसार पर्यावरणाची ही समस्या अशीच राहिली तर येत्या पन्नास वर्षांमध्ये या पृथ्वीवर जीवसृष्टि राहिल की नाही याविषयी शंका आहे. अशा या समस्यांचे कारण म्हणून उत्खनन, वृक्षतोड, लोकसंख्यावाढ, वाढते औद्योगीकरण, वायू व जल प्रदूषण यांसारख्या बाबींवर वारंवार चर्चा होत असते. अशा या समस्यांवर उपाय सुचविण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगोल, कृषिशास्त्र इत्यादी विषयांतील तज्ञ आपले मत मांडत असतात. पण प्रत्यक्ष व्यवहारामध्ये त्यांच्या त्या मतांचा म्हणावा तसा सकारात्मक परिणाम पाहावयास मिळत नाही. म्हणून तत्त्वज्ञानाचा अभ्यासक म्हणून तत्त्वेवेत्यांनी देखील भूमिका मांडणे आता आवश्यक आहे.

तत्त्वज्ञान हा एक उपाय असल्याच्या संदर्भाने :

पर्यावरणाच्या समस्यद्यासंदर्भात उपाय सुचविणारी उपरोक्त सर्व शास्त्रे वर्णनात्मक आहेत. परिणामी त्यांचे उपायदेखील वर्णनात्मक स्वरूपाचेच असावेत. म्हणून पर्यावरणीय समस्यांवर आदर्शात्मक स्वरूपाचे उपाय सुचविणे ही काळाची गरज बनली आहे. आणि ही गरज तत्त्वज्ञानासारख्या विषयामुळे आणि तत्त्ववेत्यांच्या भूमिकेमुळे पूर्ण होऊ शकते. यासंदर्भात उदाहारण म्हणून आपल्याला 'मानवाच्या आरोग्यविषयक समस्या' आणि त्यावर उपाय म्हणून 'योग–आसन' याचा उल्लेख करावा लागेल. कारण आज आपण पाहत आहोत की, संपूर्ण जगाने अरोग्याच्या निरोगीपणासाठी तत्त्वज्ञानातील 'योग–आसनांचा' योग दिनाच्या निमित्ताने स्वीकार केलेला आहे. अर्थात पर्यावरणीय समस्येच्या संदर्भातही तत्त्वज्ञानतून एक पूरक असा उपाय समोर येऊ शकतो, हा विश्वास ठेवणे तत्त्ववेत्यांची मूलभूत भूमिका आहे.

मनुष्याच्या स्वभावात बदल घडविण्याच्या संदर्भाने :

पर्यावरण हे एक विशाल जग आहे. हे जग त्याच्याअंतर्गत नियमांच्या आधारे बदलत आणि संतुलित होत राहते. हा त्याचा स्वभाव आहे पण विद्वानांच्यामते, आज पर्यावरणाच्या स्वरुपातही बदल होत आहेत. या बदलामागे काही दृश्य आणि काही अदृश्य कारणे आहेत. तसेच काही नैसर्गिक आणि काही कृत्रिम

कारणेदेखील आहेत. कृत्रिम समस्या विशेषत: मानवनिर्मित समस्या मानल्या जातात. नैसर्गिक समस्यांमध्ये वादळ, तापमान, जंगलातील आग, भूकंप, दुष्काळ, पूर इ. तर मानवनिर्मित समस्यांमध्ये लोकसंख्या, वृक्षतोड, शहरीकरण, प्रदूषण इत्यादी विषय प्रमुख आहेत

आज मनुष्याला आपल्या स्वत:चे अस्तित्व महत्त्वाचे वाटत आहे आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी तो आपल्या सभोवतालच्या सर्व घटकांना साधन मानत आहे. त्याच्यासाठी पर्यावरण व पर्यावरणातील विविध घटकदेखील साधन आहेत. खरे तर, मनुष्याच्या या स्वार्थी आणि अनैतिक वर्तनामुळे आपण आज अनेक पर्यावरणीय समस्यांना तोंड देत आहोत. विशेष म्हणजे मनुष्याच्या या वर्तनामुळे भविष्य असुरक्षित दिसायला लागले आहे. तेव्हा अशा परिस्थितीत मनुष्याच्या स्वभावात बदल घडवून आणून, त्याला पर्यावरणपूरक बनवीणे ही तत्त्ववेत्यांची भूमिका आहे

मोक्षप्राप्तीच्या संदर्भाने :

साधारणपणे आपण पाहतो की, भारतीय तत्त्वज्ञानात मोक्ष, कैवल्य, निर्वाण, अपवर्ग इत्यादींना महत्त्व दिले गेले आहे. एका अर्थाने ह्या सर्व बाबी मानवी जीवनाचे ध्येय आहे. या ध्येयाला प्राप्त करण्यासाठी भारतीय दर्शनांमध्ये तत्त्वांच्या ज्ञानाला अनिवार्य मानले आहे. अशा या तत्त्वांमध्ये चार महाभूत, गती (धर्म), स्थीती (स्थिती), पुदगल, परमाणू, आकाश आणि स्वत: मानवी देहसुद्धा समाविष्ट आहे. आपण जर पर्यावरणाच्या विविध व्याख्या लक्षात घेतल्या तर आपल्या हे लक्षात येईल की, आपण भारतीय तत्त्वज्ञानात ज्या तत्त्वांना अनुसरुन चर्चा करतो, त्यापैकी बहुतांश तत्त्वे ही पर्यावरणाची घटक आहेत आणि म्हणून, ''किमान मोक्षप्राप्तीच्या अनुषंगानेतरी ज्याला आपण 'तत्त्व' म्हणतो त्या पर्यावरणाच्या घटकांचा सुव्यवस्थित अभ्यास करुन त्यांचे संर्वधन करण्यासंबंधीचे संस्कार आपण समाजमनावर बिंबविले पाहिजेत, ही तत्त्ववेत्यांची भूमिका असली पाहिजे.

पृथ्वीविषयी मातृभाव उत्पन्न करण्याच्या संदर्भाने :

आपण पाहतो की, ''पृथ्वी ही जलयुक्त आहे. पृथ्वीवर अषौध स्वरूपी अनेक प्रकारच्या वनस्पती, लता आहेत. पृथ्वीच्या गर्भात अनेक प्रकारचे रत्न, सुवर्ण आहेत. पृथ्वी आम्हाला आश्रय देणारी आहे. आमचे पोषण करणारी आहे.'' विशेष म्हणजे पृथ्वीचे हे स्वरूप अथर्ववेदाच्या 'पृथ्वी सूक्तामध्ये'१ करण्यात आलेले आहे. याशिवाय पृथ्वीच्या विविध गुण वा रूपाचे वर्णन त्याठिकाणी झालेले आहे. पृथ्वीच्या या सर्व गुणांना पाहून त्याठिकाणी शेवटी पृथ्वीला 'माता' मानले आहे.२ तेव्हा अशा या विचारांच्या आधारे पृथ्वीरूपी मातेला प्रदूषण, वृक्षतोड यासारख्या समस्येतून वाचविण्यासाठी समाजमनाला प्रेरित करता येते, या विषयी तत्त्ववेत्यांनी भूमिका घेतली पाहिजे.

अजैविक घटक वा देवतांच्या संदर्भाने :

आज आपण सूर्य, चंद्र, तारे, पाऊस, उषा इत्यादींना अजैविक घटक मानतो. पण ऋग्वेदामध्ये वरुण, सूर्य, चंद्र, उषा इत्यादींना देवता मानले आहे. सूर्याला जगाचा कर्ता आणि पोषक म्हणून पाहिले आहे.३ परंतु हीच सूर्यदेवता आज मानवी आरोग्यासाठी खरेच पूर्णपणे पोषक ठरत आहेत का? वेदांच्या भाषेत विचारावयाचे झाल्यास 'देवाची आपल्यावर कृपा होत आहेका?' असा प्रश्न उपस्थित होतो. कारण आज ओझोनच्या थराला चाळणी बसली आहे. परिणामी सजीव सृष्टिला 'ड' जीवनसत्व मिळत असतांनाच अपेक्षित नसलेली अतिनील किरणेही मिळत आहेत. ओझोनच्या संदर्भातली ही समस्या अशीच वाढत गेली तर अतिनिल किरणांमध्ये ही वाढ होऊन एक दिवस पृथ्वीवरचे सर्व हिमनग वितळतील आणि 'पृथ्वी एक दिवस पाण्यात बुडणार!' या आशयाचे पाश्चात्य तत्त्वज्ञ थेलीसचे विचार खरे ठरतील. तेव्हा या सूर्यदेवतेची अवकृपा हेऊ नये यासाठी मानवाने ओझोनचा थर अधिक फाटणार नाही, यासाठी वायु प्रदूषणावर नियंत्रण मिळवीले पाहिजे. याशिवाय आज आपण पाहात आहोत की, जल प्रदूषणामूळे उत्तम व शुद्ध पाणी आपल्याला मिळत नाही. म्हणून खरोखरच जल देवताही आपल्यावर अवकृपा करित नाही ना? असा प्रश्न पडतो. पण या देवतांच्या अवकृपेचे कारण आपनच आहोत, हे सुद्धा आपण लक्षात घेतले पाहिजे तेव्हा या सूर्य, जल आदी देवतांची पुन्हा कृपा

करुन घेण्यासाठी या देवताना अनुकूल किंवा अपेक्षीत असलेले आचरण आपल्याला करावे लागेल! ही भावना समाज मनात रूजवीण्याच्या संदर्भाने विचार करने ही देखील तत्त्ववेत्त्यांची भूमिका असली पाहिजे.

वृक्ष संवर्धनाच्या संदर्भाने :

वेदांमध्ये सोम म्हणजेच वनस्पती ही देवता मानली गेली आहे अथर्ववेदात 'शं नो अग्नि: सहाद् भिरस्तु शं सोम: सहोषधीभि:'४ ही ऋचा आहे. यानुसार सोम म्हणजे वनस्पति हीदेखील औषधी आहे. तेव्हा अशा या औषधीस्वरूप वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी वृक्षतोड रोखणे, वृक्षांचे संवर्धन करने, वृक्ष लागवड करणे अशा कितीतरी प्रकारांनी समाजाला संस्कारित करण्याचे कार्य करण्यासंबंधीची तत्त्ववेत्यांची भूमिका असली पाहिजे.

गीतेत श्रीकृष्ण म्हणतात, सर्व वृक्षांमध्ये मी आश्वत्थ म्हणजे वटवृक्ष आहे.५ त्या अनुषंगाने आपल्या सर्वांना वड आणि पिंपळ ही वृक्षाचे महत्त्व माहित आहे. वड आणि पिंपळ हे सर्व वृक्षांमध्ये सर्वाधिक ऑक्सीजन देणारे वृक्ष मानले जातात. पण आज औद्योगीकीकरणाच्या नावाखाली, रस्ते निर्माण योजनेच्या नावाखाली कितीतरी पिंपळ आणि वडांच्या झाडांचा नायनाट या व्यवस्थेने केला आहे. तेव्हा अशा या जीवन उपयोगी वृक्षांच्या संवर्धनासाठी 'मी पिंपळ वृक्ष आहे.', 'स्व रक्षणासाठी वृक्ष संवर्धन!' ही भावना समाजमनात रूजविण्याची भूमिका तत्त्ववेत्यांची असली पाहिजे. याशिवाय संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'वृक्ष वल्ली आम्हां सोयरे' ही भावना समाज मनात रूजविण्यासंदर्भात तत्त्ववेत्यांची एक विशेष भूमिका असली पाहिजे.

मनुष्य आणि इतर जीवघटकातील एकीभावाच्या संदर्भाने :

आज आपण पाहत आहोत की, समाजामध्ये व्यक्तीव्यक्तीमध्ये भेदभाव केला जात आहे. मनुष्य आपल्याशिवाय इतर पशु–प्राण्यांना साधन मानत आहे. मोठया प्रामाणात पशुहिंसा होत आहे. पण जेव्हा आपण ऋग्वेदातील विराट पुरुषाची संकल्पना पाहतो, तेव्हा आपल्याला पर्यावरणाच्या त्या विशाल स्वरूपाचे चित्रण पाहायला मिळते. मनूष्य असो किंवा इतर पशू व प्राणी, वायू असो किंवा अग्नी, चंद्र–सूर्य असो किंवा अंतराळ हे सर्व त्या पर्यावरणस्वरूपी विराट पुरुषाचे घटक आहेत, हा भाव त्याठिकाणी पहावयास मिळतो.६

तेव्हा विराट पुरुषाची संकल्पना ही पर्यावरणाच्या अर्थाला पूरक असलेली संकल्पना आहे, हा दृष्टिकोन ठेवून जर तत्त्ववेत्यांनी आपली भूमिका मांडली तर ''मानव आणि पर्यावरण, मानव आणि इतर पशू–प्राणी, व्यक्ती–व्यक्ती, मानव आणि अजैविक घटक' या सर्वांमध्ये एक अनुसंबंध आहे हे सिद्ध होऊ शकते आणि पर्यायाने 'पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे माझा ऱ्हास!' ही भावना समाजमनात विकसित होऊन निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्येवर एक कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी तत्त्ववेत्यांची भूमिका फार महत्त्वाची ठरु शकते.

वास्तविकतेच्या संदर्भाने :

जीवन जगत असताना काही असे विषय असतात की, त्यासंदर्भात वास्तिविक ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सुद्धा तत्त्ववेत्यांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रामुख्याने खालील मुद्यांना अनुसरुन तत्त्ववेत्यांनी समाजाचे लक्ष केंद्रित केले पाहिजे :

१) पर्यावरण एक शाश्वत सत्ता आहे, त्याचा नाश अशक्य आहे पर्यावरणाचे एक सौंदर्य आहे. त्याला सुंदर बनवणे हे मानवाच्या हाती नाही पण ते सौंदर्य टिकवून ठेवण्यात मनुष्य पर्यावरणाचा मित्र बनू शकतो.

२) पर्यावरण ही एक विशाल सत्ता आहे. मनुष्य या पर्यावरणाचा एक अंश आहे. मनुष्याचे अस्तित्व असो अथवा नसो पण पर्यावरणाचे अस्तित्व नित्य आहे.

३) मुळात बदल हा पर्यावरणाचा स्वभाव आहे. पण त्या बदलाचेही काही नियम आहेत. आज पर्यावरणाच्या बदलात काही प्रमाणात अनियमितता आली असल्याचे सांगितले जाते. त्याचा परिणाम मानवी जीवनावरही होत आहे, परंतु पर्यावरणाच्या अनियमित व्यवहारासाठी काही प्रमाणात मनुष्यही कारण ठरत आहे. मनुष्याचा स्वार्थी स्वभाव पर्यावरणासाठी घातक आहे. पण मनुष्याच्या स्वभावात बदल घडवून आणणे शक्य आहे.

अशा प्रकारे पर्यावणीय समस्या सोडविण्यासाठी प्रत्यक्ष समाज मानावर संस्कार करण्याची आज आवश्यकता आहे. तेव्हा तत्त्वज्ञानातील वेगवेगळया संकल्पना वा विचारांना वेगवेगळया दृष्टिकोनातून पाहणे, त्यातील प्रासंगिकता, उपयुक्तता लक्षात घेत त्याला नवीन रूपाने मांडणे ही तत्ववेत्यांची भूमिका असली पाहिजे, असे या प्रसंगी वाटते

संदर्भ:

१) अथर्ववेद, १२/१/१ ते ६३
२) भूमे मातर्नि धेहि मा भद्रया सुप्रतिष्ठतम् । – अथर्ववदे, १२/१/६३
३) वेदप्रकाश (डॉ) डोणगावकर, भारतीय तत्त्वज्ञान, मैत्रि प्रकाशन, लातूर, २०२०
४) अथर्ववेद, २/१०/२
५) अश्वत्थ: सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारद । गीता – १०/२६
६) ऋग्वेद, १०/९०/१ ते १६